## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर २००३

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/२०९३/प्र.क्र. ४६२/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई साठ) (यात यापुढे ज्याचा ''उक्त अधिनियम'' असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, महसूल व वन विभाग, क्र.मुद्रांक २०००/प्र.क्र.१०२६/म-१, दिनांक ५ मार्च २००१ हा आदेश काढला आहे, आणि त्याद्वारे, उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ खालील तारणगहाण, हडप, तारण, हक्कलेख-निक्षेप (अनुच्छेद ६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), गहाण मालमत्तेवरील अधिक प्रभार (अनुच्छेद ३३), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६) गहाणखत (अनुच्छेद ४०) आणि प्रतिभूति बंधपत्र (अनुच्छेद ५४) या संलेखांवर आणि कोणत्याही व्यक्तीने गट क, ड, आणि ड + क्षेत्रात आणि कोणतेही उद्योग नसलेल्या जिल्ह्यात नवीन उद्योग सुरू करण्यासाठी आणि उद्योगांचा नव्याने विस्तार करण्यासाठी केलेल्या संलेखांवर, या अधिनियमाखाली आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात दिनांक ३१ मार्च २००६ रोजी समाप्त होणा-या कालावधीसाठी सूट दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, मुद्रांक शुल्कात विवक्षित फेरबदलांसह अशी सूट देणे, महाराष्ट्र शासनास इष्ट वाटत आहे ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री पटल्यामुळे, याद्वारे, असे जाहीर करीत आहे की, दिनांक ४ जून २००३ रोजी सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ मे २००८ रोजी समाप्त होणा-या कालावधीसाठी गट क, ड, आणि ड+ क्षेत्रात आणि कोणतेही उद्योग नसलेल्या जिल्ह्यात, नवीन माहिती तंत्रज्ञान युनिट आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट सुरू करण्यासाठी आणि माहिती तंत्रज्ञान युनिटाचा व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिटाचा नव्याने विस्तार करण्यासाठी, कोणत्याही व्यक्तीने केलेल्या उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ खालील तारणगहाण, हडप, तारण,हक्कलेख-निक्षेप (अनुच्छेद ६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), गहाण मालमत्तेवरील अधिक प्रभार (अनुच्छेद ३३), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६) गहाणखत (अनुच्छेद ४०) आणि प्रतिभूति बंधपत्र (अनुच्छेद ५४) या संलेखांवरील मुद्रांक शुल्कात सूट मिळू शकेल तसेच संमती व परवानगी (अनुज्ञा),करारनामा

[अनुच्छेद ३६(अ)] आणि भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०) याबाबतच्या अतिरिक्त संलेखांवर आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्काच्या ९० टक्के एवढी सूट ४ जून, २००३ पासून सुरू होणा-या व ३१ मे २००८ रोजी संपणा-या कालावधीसाठी मिळू शकेल, असे जाहीर करीत आहे.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, नवीन " माहिती तंत्रज्ञान युनिट " आणि "माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट" किंवा नव्याने विस्तार करण्यात आलेले "माहिती तंत्रज्ञान युनिट" आणि "माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट" याचा अर्थ, विकास आयुक्त (उद्योग) किंवा यासंबंधात त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी याने असे युनिट म्हणून प्रमाणित केलेले औद्योगिक युनिट, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.